आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ७.००  वाजता

२३ सप्टेंबर २०२४ -सोमवार

**ठळक बातम्या**

- राज्याच्या सांस्कृतिक धोरण-२०२४ ला मंत्रिमंडळाची मान्यता, लोहगाव विमानतळाचं नामांतर जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुणे, असं करण्याचा निर्णय

- कुणबी समाजातल्या तीन पोटजातींचा “इतर मागासवर्ग” यादीत समावेश करायला, तसंच शिरूर ते छत्रपती संभाजीनगर या नवीन ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाला मंत्रिमंडळाची मंजुरी

- २०२५ मधे ऑस्करच्या शर्यतीत भारताचं प्रतिनिधित्व “लापता लेडीज” करणार

- अमरावतीत खासगी बस नदीत कोसळून ४ जणांचा मृत्यू, २५ जखमी

**आणि**

- शेअर बाजारात तेजी कायम /सेन्सेक्सची ८५ हजाराकडे, तर निफ्टीची २६ हजाराकडे घोडदौड

**<><><><><><>**

राज्याच्या सांस्कृतिक धोरण-२०२४ ला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

महाराष्ट्राला एक सशक्त सांस्कृतिक केंद्र म्हणून ओळख निर्माण करुन देणं, आपल्या समृद्ध वारसा आणि कलेची जपणूक करुन जागतिक पातळीवर राज्याचं सांस्कृतिक महत्व अधोरेखित करणं. या दृष्टीनं हे सांस्कृतिक धोरण तयार केलं आहे.

ऐतिहासिक ठिकाणं, कला संग्रहालयं आणि साहित्य यासारख्या सांस्कृतिक संपत्तीचं संरक्षण आणि संवर्धन करणं, सांस्कृतिक कार्यक्रमांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी वित्तीय योजना तयार करणं, धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी कायदेशीर चौकट तयार करणं, सांस्कृतिक पायाभूत सुविधा निर्माण करणं, सांस्कृतिक धोरणाद्वारे सामाजिक एकता वाढीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणं, ही या धोरणाची उद्दीष्ट्यं आहेत. या धोरणाचा दर पाच वर्षांनी आढावा घेतला जाणार आहे.

दूध अनुदान योजना सुरु राहणार असून त्यासाठी उत्पादकांना गायीच्या दुधाकरता लीटरमागे ७ रुपयांचं अनुदान देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं आज घेतला.

पुण्याच्या लोहगाव विमानतळाचं नाव बदलून जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुणे, असं करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत झाला. राज्यातल्या १४ आयटीआय संस्थांचं नामकरण करण्याचा निर्णयही यावेळी झाला.

पणन हंगाम २०२३-२४साठी धानाच्या भरडाईकरता भात गिरणीधारकांना प्रती क्विंटल चाळीस रुपये अतिरिक्त भरडाई दर मंजूर करण्याचा निर्णय मंत्रीमंडळानं घेतला. त्यासाठी अतिरिक्त ४६कोटी ५५ लाख रुपयांच्या खर्चाला बैठकीत मान्यता देण्यात आली.

कुणबी समाजातल्या “तिलोरी कुणबी”, “तिल्लोरी कुणबी”, “ति.कुणबी” या पोटजातींचा राज्य शासनाच्या “इतर मागासवर्ग” यादीत समावेश करायला आज मंत्रीमंडळानं मान्यता दिली.

शिरूर ते छत्रपती संभाजीनगर या नवीन ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गालाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी पदांचं एकत्रीकरण करून या पदाचं नाव ग्रामपंचायत अधिकारी करायला आज मान्यता देण्यात आली.

त्याशिवाय जीएसटी अधिनियमात सुधारणा, ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ, राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ, जलसंपदा कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी, इत्यादी निर्णय या बैठकीत झाले.

**<><><><><><>**

जगातल्या प्रत्येक क्षेत्रात विकासासाठी तंत्रज्ञानाची आवश्यकता असून तंत्रज्ञान विश्वव्यापी असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. अमेरिका दौऱ्यात न्यूयार्कमध्ये अमेरिकेतल्या तंत्रज्ञान क्षेत्रामधल्या आघाडीच्या कंपन्यांच्या मुख्य व्यवस्थापकीय संचालकांची गोलमेज परिषद प्रधानमंत्री मोदी यांनी घेतली. तिथं ते बोलत होते.

**<><><><><><>**

राज्यभरात राष्ट्रीय पोषण माह राबवला जात आहे. राज्यातल्या नागरी, ग्रामीण आणि आदिवासी भागात एक लाखांहून अधिक अंगणवाडी केंद्रांद्वारे यासंबंधी जनजागृती आणि अंमलबजावणी सुरू आहे. बालकं, गरोदर आणि स्तनदा महिलांपर्यंत लाभ पोहोचवला जात आहे. दररोज वेगवेगळे उपक्रम राबवण्याच्या सूचना राज्यातल्या अंगणवाडी केंद्रांना देण्यात आल्या आहेत. याची माहिती देण्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्त कैलास पगारे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले.

**होल्ड - कैलास पगारे (२४ सेकंद)**

**<><><><><><>**

भारतीय लष्कराला सक्षम करण्यासाठी सैनिकी शाळा महत्वाची भूमिका बजावतात, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. जयपूर मध्ये सैनिकी शाळेच्या

उद्घाटनावेळी ते बोलत होते. ही शाळा तरुणांसाठी वरदान ठरेल, तसंच सशस्त्र दलात भरती होण्यासाठी या शाळेद्वारे त्यांना संसाधनं आणि योग्य मार्गदर्शन मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे देशभरात शंभर सैनिकी शाळा उभारण्याची केंद्र सरकारीच योजना आहे. जयपूरमधली ही शाळा याचाच एक भाग आहे.

<><><><><>

निवडणूक आयोगाचं पथक २६ ते २८ सप्टेंबर या दरम्यान महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहे. या काळात राज्यातले विविध राजकीय पक्ष, राज्य निवडणूक आयोग, सुरक्षा यंत्रणा आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यासोबत आयोगाचं पथक बैठक घेणार आहे. २८ सप्टेंबरला मुंबईत आयोगाची वार्ताहर परिषद होईल. यात राज्यातल्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

पुढच्या वर्षी म्हणजेच २०२५ मधे होणाऱ्या अकादमी पुरस्कार सोहळ्यासाठी भारताकडून लापता लेडीज हा चित्रपट पाठवला जाणार आहे.

किरण राव दिग्दर्शित हा चित्रपट बेस्ट फॉरेन फिल्म विभागात भारताचं प्रतिनिधित्व करेल, असं भारतीय चित्रपट महासंघानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

अमरावती जिल्ह्यात मेळघाटातल्या सेमाडोह परिसरात आज खासगी बस पुलावरून नदीत कोसळून झालेल्या अपघातात ४ जण ठार तर २५ जण जखमी झाले. यापैकी ७ जणांची प्रकृती गंभीर आहे. ही बस अमरावतीहून धारणीच्या दिशेने प्रवास करत होती. चालकाचं नियंत्रण सुटल्याने बस पुलावरून नदीत कोसळल्याची माहिती मिळत

आहे. बसमधले अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले असून व्याघ्र प्रकल्पाचे कर्मचारी आणि पोलीस पथक मदतकार्य करत आहेत.

<><><><><><>

बुलडाणा जिल्ह्यातल्या मोताळा तालुक्यात टिप्पर उलटून झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. हे मजूर खामगाव तालुक्यातल्या वाडी इथले रहिवासी होते.

<><><><><><>

शेअर बाजारामधल्या व्यवहारांमध्ये दिवसभरात तेजी दिसून आली. सकाळच्या सत्रातच शेअर बाजारानं आतापर्यंतचा सार्वकालिक उच्चांक गाठला होता. दुपारच्या सत्रातही तेजी कायम राहिली. बाजार बंद होताना मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ३८४ अंकांची वाढ नोंदवत ८४ हजार ९८० अंकांच्या नवा उंचीवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही१४८ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ९३९ अंकांच्या विक्रमी उंचीवर बंद झाला.

<><><><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईत केंद्रीय चित्रपट प्रमाणीकरण मंडळ आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या कामकाजाचा आढावा घेतला,. तत्पूर्वी आज सकाळी जे. पी. मॉर्गन भारतीय गुंतवणूकदार परिषदेत ते सहभागी झाले होते.

<><><><><><>

मुंबई उच्च न्यायालयाच्या नव्या इमारतीचं भूमिपूजन सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या हस्ते आज झालं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी. आर. गवई,

न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, न्यायमूर्ती उज्जल भुयान, न्यायमूर्ती अभय ओक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यात कालपासून पुन्हा पावसाने हजेरी लावली आहे. मुंबई आणि उपनगर परिसरात पावसाच्या जोरदार सरी अधूनमधून येत आहेत. **रत्नागिरीत** आज दुपारपासून मळभ होतं मात्र संध्याकाळी जोरदार पावसाला सुरुवात झाली.

**सांगली जिल्ह्यात तासगाव, पलूस, मिरज, कवठेमहांकाळ आणि वाळवा** तालुक्यात मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला असून ओढे, नाले भरून वाहू लागले आहेत.

**अहमदनगर** शहरातही संध्याकाळी जोरदार पाऊस झाला.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी, मराठवाडा आणि विदर्भातही बऱ्याच ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**